वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०१ /२०२६ दि. १४ /०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत २२ नंबर सर्कल ते साठेनगर चौक पर्यत रिंग मेट्रो चे कामासाठी मुख्य रस्त्यावर खोदकाम करण्यात येणार आहे. नमुद रोडच्या कडेला यापुर्वी समातंर पार्किंग व पी–१, पी–२ ची पार्किंग करण्यात आलेले असुन रिंग मेट्रो चे कामासाठी समातंर पार्किंग व पी–१, पी–२ ची पार्किंग हटविण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

समांतर पार्किंग क्षेत्र नो पार्किंग केले बाबत २२ नंबर सर्कल ते साठेनगर चौक पर्यत समातंर पार्किंग असलेल क्षेत्र **नो पार्किंग** करण्यात येत आहे.

पी–१,पी–२ क्षेत्र नो पार्किंग केले बाबत २२ नंबर सर्कल ते साठेनगर चौक पर्यत पी–१, पी–२ असलेले क्षेत्र **नो पार्किंग** करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक १७/०९/२०२६ रोजी पासुन दिनांक १६/०९/२०२७ रोजी पर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.